www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज


# दैनिक युवक आधार

मराठी

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १७४ वा सोमवार दि. १० मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




## फसव्या जाहिरातींची चमकदार दुनिया

### ग्राहकांच्या विश्वासाचा खेळ कोण करतंय?

**दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

**आसाराम विरकर । उपसंपादक** : कोल्ड्रिंक्स, सौंदर्य प्रसाधने, बाथिंग साबण, तंबाखू, मद्य आणि विविध उत्पादने यांची जाहिरात करताना ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अनेकदा फसवे आणि दिशाभूल करणारे दावे केले जातात. हेलिकॉप्टरमधून स्टंट करणे, रोपवेवरून कोल्ड्रिंक पिणे आणि त्यानंतर वेगळा अजब स्टंट करून दाखवणे, सौंदर्यप्रसाधनांच्या क्रीम्स वापरून त्वचा काही सेकंदांत गोरी होते असे दाखवणे, केसांची गळती एका आठवड्यात थांबते असे भासवणे, विविध साधनांच्या जाहिरातींमध्ये अवास्तव दावे करणे, तंबाखू आणि मद्याच्या जाहिरातींमध्ये अप्रत्यक्षपणे सेलिब्रिटींचा प्रभाव टाकणे अशा पद्धतीने मोठमोठ्या कंपन्या ग्राहकांना भूलवतात.विशेषतः तंबाखू आणि मद्य उद्योग जाहिरातबंदी असूनही सरोगेट ॲडव्हर्टायझिंगचा (Surrogate Advertising) वापर करून ग्राहकांची दिशाभूल करतात. तंबाखू उत्पादनांच्या जाहिरातींमध्ये खेळाडू, अभिनेते आणि प्रसिद्ध व्यक्ती अप्रत्यक्षपणे जाहिरात करताना दिसतात, जसे की तंबाखू उत्पादनाच्या नावाने इलायची किंवा वेगळी उत्पादने दाखवली जातात.परंतु, या जाहिराती वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध नसतात आणि ग्राहकांची फसवणूक करण्याचे माध्यम ठरतात. त्यामुळे ग्राहकांमध्ये चुकीच्या अपेक्षा तयार होतात आणि त्याचा मोठा आर्थिक तसेच आरोग्यावर गंभीर परिणाम होतो.

**फसव्या जाहिरातींवर कोण जबाबदार ?**

भारतात ग्राहक संरक्षण कायदा, 2019 आणि ॲडव्हर्टायझिंग स्टँडर्ड्स काउंसिल ऑफ इंडिया (ASCI) यांच्या नियमानुसार चुकीची माहिती देणाऱ्या जाहिरातींवर कारवाई केली जाऊ शकते.

**1. कंपनीची जबाबदारी:**

जाहिरात तयार करणारी आणि ती प्रसारित करणारी कंपनी मुख्यतः जबाबदार असते.

उत्पादनाचे वैज्ञानिक आधार नसलेले किंवा दिशाभूल करणारे दावे करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई होऊ शकते.

उदाहरणार्थ, त्वचा काही सेकंदांत गोरी होईल, केस एका आठवड्यात गळणे बंद




होतील, कोल्ड्रिंक प्यायल्याने थकवा लगेच निघून जाईल, मद्य प्यायल्याने आनंदी जीवन मिळते असे दाखवणाऱ्या जाहिराती वास्तवाला धरून नसतात.

**2. कलाकाराची जबाबदारी:**

जाहिरातींमध्ये सहभागी होणाऱ्या कलाकारांनी किंवा ब्रँड अँबॅसिडरने उत्पादनाच्या सत्यतेची पडताळणी करणे आवश्यक आहे.ग्राहक संरक्षण कायद्याच्या तरतुदीनुसार कलाकार जर जाणून-बुजून फसव्या दाव्यांचे समर्थन करत असतील, तर त्यांच्यावर देखील कारवाई केली जाऊ शकते.उदाहरणार्थ, एखादा प्रसिद्ध सेलिब्रिटी जर रोपवेवरून कोल्ड्रिंक पितो आणि त्यानंतर हवेत झेपावून एखादा भन्नाट स्टंट करतो, तर त्यावर विश्वास ठेवायचा का? की हा केवळ भुलविण्याचा प्रकार आहे?तंबाखू आणि मद्याच्या जाहिरातींसाठी देखील कलाकार जबाबदार असतात. अनेक बड्या कलाकारांनी यापूर्वी तंबाखू आणि मद्याशी संबंधित ब्रँडच्या जाहिराती केल्या आहेत आणि त्यांना सामाजिक रोषाला सामोरे जावे लागले आहे.मद्य आणि तंबाखूच्या जाहिरातींचे खरे परिणाम 'तेच' आहेत का, जे दाखवले जातात?तंबाखू आणि मद्याच्या जाहिरातींमध्ये कलाकार हसतमुख चेहऱ्याने आनंद घेताना, यशस्वी आणि खुशहाल जीवन जगताना दाखवले जातात. जाहिरातीत दाखवल्याप्रमाणे मद्य प्यायल्याने खरंच आयुष्य सुंदर होतं का? तंबाखू सेवन केल्याने आत्मविश्वास वाढतो का? की मग ते फुफ्फुसाचा कर्करोग, हृदयरोग, आणि व्यसनाधीनतेकडे घेऊन जाते?जर मद्य आणि तंबाखू इतकेच फायदेशीर असते, तर सरकारने त्यांच्या पॅकेटवर 'घातक आरोग्यपरिणाम' लिहिण्याची सक्ती का केली आहे?

**फसवणुकीची तक्रार कुठे करावी ?**

- जर कोणत्याही जाहिरातीमुळे दिशाभूल होत असेल, तर ग्राहकांनी खालील ठिकाणी तक्रार दाखल करू शकतात:
- ग्राहक संरक्षण मंच (National Consumer Helpline - 1915)
- ॲडव्हर्टायझिंग स्टँडर्ड्स काउंसिल ऑफ इंडिया (ASCI) - www.ascionline.org
- भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (FSSAI) - जर अन्न व पेय पदार्थ संबंधित असेल
- संबंधित पोलिस ठाणे किंवा ग्राहक न्यायालयात तक्रार दाखल करता येते.

**फसव्या जाहिरातींवर कारवाई का गरजेची आहे ?**

कोल्ड्रिंक पिल्यावर स्टंट करता येतो, सौंदर्यप्रसाधनांचा वापर केल्याने क्षणार्धात सौंदर्य खुलते, मद्य सेवन केल्याने जीवन अधिक मजेशीर होते, तंबाखू खाल्ल्याने मर्दानगी वाढते अशा जाहिरातींमुळे समाजात चुकीचे संदेश पोहोचतात.अशा फसव्या जाहिरातींना आळा घालण्यासाठी ग्राहकांनी जागरूक राहणे आवश्यक आहे आणि जाहिरातींमध्ये दाखवलेले वास्तवात घडते का, यावर प्रश्न विचारणे गरजेचे आहे. प्रश्न असा आहे की, जर कोल्ड्रिंक प्यायल्याने स्टंट करता येतो, तर सामान्य ग्राहकांनीही तसे करून दाखवावे का?

## सणसर मध्ये श्री छत्रपती संभाजीराजे बलिदान दिनानिमित्त छावा चित्रपटाचे आयोजन




**दैनिक युवक आधार**

**सणसर । विकास क्षत्रिय** : सध्या देशामध्ये धर्मवीर श्री छत्रपती संभाजीराजेंच्या जीवनावर आधारित गाजत असलेला हिंदी चित्रपटाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती प्रविण शिंदे,यात्रा कमिटी खजिनदार मिथुन बारवकर,विश्व हिंदू परिषदेचे इंदापूर तालुका अध्यक्ष बजरंग रायते यांनी दिली. मंगळवारी दि 11 मार्च रोजी हा चित्रपट सणसर गावातील बाजारतळ येथील पटागंण संध्याकाळी 8 वाजता सणसर येथे दाखवण्यात येणार आहे. गावातील व परिसरातील लोकांना छत्रपती संभाजी महाराज यांचा खरा इतिहास समजण्यासाठी या चित्रपटाचे आयोजन करण्यात आले असल्यामुळे सर्व ग्रामस्थ बंधू भगिनी व विद्यार्थ्यांनी हा चित्रपट पाहण्याचा लाभ घ्यावा अशी विनंती प्रवीण शिंदे,स्वप्नील शिंदे यांनी केली आहे.

## कोपर वाडीतील महिलांना मिळणार हक्काचे घर...

### महिला दिनानिमित्ताने केले घरकुलाचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : महिला दिनाचे औचित्य साधून कोपर वाडीतील महिलांना हक्काचे घर मिळणार आहे. या घरकुलाचे भूमीपूजन ग्रामविकास अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत पंतप्रधान आवास योजना(ग्रामीण) अंतर्गत वडघर ग्रामपंचायत हद्दीतील कोपर वाडी येथील 18 लाभार्थी महिलांना हक्काचं घर मिळणार आहे. त्याचं भूमिपूजन वडघर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी मोहन दिवकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी लाभार्थी महिला उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत कर्मचारीही उपस्थित होते.



## पोलिसांनी महिलांना दिल्या महिला दिनाच्या शुभेच्छा



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तिरुपती काकडे उपयुक्त वाहतूक, विठ्ठल कुबडे सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक यांच्या संकल्पनेतून वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज पाटील, पोलीस उपनिरीक्षक सुशांत खराटे , पोलीस अंमलदार संजय गावडे पोलीस अमलदार, सचिन पाटील यांनी पनवेल बस डेपो येथे महिला वाहक तसेच इतर प्रवासी यांना महिला दिनाच्या गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा देऊन सन्मान केला. तसेच संकटाचे वेळी 112 येथे कॉल करणे बाबत तसेच वाहतुकीचे नियम पाळणे बाबत प्रबोधन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## प्रयागराजचे जलपुजन करत शिवडीत ग्रामस्थांना महाअमृतकुंभचे वितरण



**युवक आधार**

**निफाड प्रतिनिधी । राहुल कुलकर्णी** : जगभरात गत दोन महिन्यांपासुन प्रयागराज येथे महाकुंभ मेळा संपन्न झाला या महाकुंभमेळ्यातील अमृतजलाचे शिवडी येथे जलपुजन करण्यात आले.अनुलोम संस्था व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माध्यमातुन गावागावात महाकुंभ मेळा संगमावरील तिर्थ पोहचविले जात आहे शिवडी येथे महाकुंभ मेळ्यातील तिर्थ कलश आणल्यावर श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात सरपंच संगिता सांगळे,रामनाथ सांगळे यांच्या हस्ते विधीवत पुजन करण्यात आले. ग्रामदैवतांना जलाभिषेक करुन ग्रामस्थांना महाकुंभातील तिर्थाचे वितरण करण्यात आले १४४ वर्षातुन आलेल्या महाकुंभ मेळ्याबाबत योगेश रोडे यांनी मार्गदर्शन केले यावेळी विशाल सोनवणे ,बाळासाहेब पानगव्हाणे, माजी सरपंच गणपतराव क्षीरसागर ,शिवडी सोसायटीचे चेअरमन अँड रामनाथ शिंदे चंद्रकांत कुलकर्णी आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते

## जागतिक महिला दिनानिमित्त महिला पोलिसांचा सन्मान काजल जाधव यांनी केला







**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : आज ०८ मार्च जागतिक महिला दिना निमित्त सामाजिक कार्यकर्त्या काजल जाधव यांनी पनवेल खांदेश्वर पोलिस स्टेशन चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्मिता ढाकणे मॅडम ,मिनल कातकर मॅडम, सृष्टी मॅडम , चौधरी मॅडम , विद्या भगत मॅडम पनवेल ट्रॉफिक महिला पोलिस रक्षक यांना गुलाब पुष्प देऊन तीन चुली हे पुस्तक सर्वांना भेट देऊन शुभेच्छा दिल्या

==================

## पनवेलकरांना मिळणार 25 खाटांचे पूर्णपणे मोफत डायलिसिस सेंटर!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शिवसेनेचे महानगरप्रमुख ड. प्रथमेश सोमण यांच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या बैठकीला उपस्थित राहून पनवेल पालिकेच्या विविध लोकाभिमुख योजना व सामाजिक प्रश्नांचा संसद रत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे व सर्व शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. यावेळेस पनवेल महापालिकेला 25 खाटांचे डायलिसिस सेंटर पूर्णतः उभारून देण्याचे वचन दिले यामुळे पनवेल मधील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्याचप्रमाणे आयुक्त मंगेश चितळे यांनी पाणीपुरवठ्याच्या नियोजनासाठी केलेल्या विविध योजनांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. बाळगंगा धरणातून वाढीव पाणीपुरवठा मिळण्यासाठी आवश्यक प्रयत्न करणार असल्याचेही आप्पा बारणे यांनी सांगितले. मालमत्ता कराच्या शास्तीबाबतही यावेळेस पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर पनवेलकरांची शास्ती पूर्णपणे माफ करण्यासाठी एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येणार



असल्याचेही आप्पा बारणे म्हणाले. व या विषयात सातत्याने पाठपुरावा करणारे महानगर प्रमुख प्रथमेश सोमण व महानगर संघटक मंगेश रानावडे यांचे विशेष कौतुक केले. तसेच शिवसेनेच्या माध्यमातून पनवेल महापालिकेला देण्यात आलेल्या सॅनिटरी पॅडच्या वेंडिंग मशीनचे ही लोकार्पण केले व पनवेल पॅटर्न म्हणून अधिकाधिक खासदार निधी देऊन हा उपक्रम आणखीन मोठ्या पद्धतीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या. याप्रसंगी काही नागरिक व पक्षाचे विविध पदाधिकारी यांनी मांडलेल्या विविध समस्यांचाही परामर्श घेण्यात आला. या ठिकाणी पनवेल महापालिकेचे आयुक्त श्री मंगेश चितळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, संपर्कप्रमुख राजेंद्र यादव महिला जिल्हा संघटिका रीना पाटील, उपमहानगर प्रमुख महेश सावंत, सचिन मोरे, महानगर संघटक मंगेश रानावडे , महिला तालुका संघटिका मंदा जंगले , खारघर शहर प्रमुख प्रसाद परब, कामोठे शहर प्रमुख सुनील गोवारी, पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे, नवीन पनवेल शहर प्रमुख अतुल मोकल, पनवेल शहर संघटक अभिजीत साखरे, प्रसिद्धीप्रमुख तोफिक बागवान, ज्येष्ठ शिवसैनिक मल्लिनाथ गायकवाड, उपशहरप्रमुख अर्जुन परदेशी, सुजन मुसलोंडकर, खंडेश धनावडे, नवीन पनवेल महिला शहर प्रमुख माया देवडे पनवेल शहर संघटिका अर्चना जाधव , कळंबोली महिला संघटिका ज्योती पाटील, महापालिकेचे उपायुक्त वैभव विधाते, श्री गावडे, अतिरिक्त आयुक्त भरत राठोड, स्वप्नाली चौधरी इत्यादी अधिकारी यासह इतर शिवसैनिक व नागरिक उपस्थित होते.

## खांदेश्वर पोलीस ठाणे अंतर्गत हद्दीत बाईक रॅलीचे आयोजन



**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : महिला व बाल विकास मंत्रालयाच्या बेटी बचाओ बेटी पढाओ या उपक्रमाला 2025 सालामध्ये दहा वर्ष पूर्ण झाली असल्याने पोलीस ठाणे हद्दीमध्ये महिला अंमलदार यांच्या बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वपोनि स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनानुसार जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पोलीस ठाणे हद्दीमध्ये बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बाईक रॅली मध्ये पोलीस ठाण्याकडील महिला पोलीस अंमलदार व अधिकारी सहभागी झाले होते.

===============

# संपादकीय

## सावित्रीबाई फुले पुण्यतिथी

सावित्रीबाई जोतीराव फुले या भारतीय शिक्षिका कवियित्री आणि समाज सुधारक होत्या. यांचा जन्म 3 जानेवारी 1831 रोजी महाराष्ट्राच्या शेतकरी कुटुंबात झाला. यांच्या आईचे नाव सत्यवती तर वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. यांचे लग्न वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी फुरसुंगीच्या गोविंदराव फुले यांचे सुपुत्र जोतिरावांशी झाले होते. जोतीराव हे देखील लग्नाच्या वेळी अवघ्या 13 वर्षाचे होते. जोतीराव देखील क्रांतिवीर आणि समाज सुधारक होते. सावित्रीबाईंच्या सासरी फुलांचा व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांना 'फुले' हे नाव देण्यात आले. यांना लग्नानंतर अपत्य झाले नाही. तर ह्यांनी एका विधवेच्या मुलाला यशवंत राव यांना दत्तक घेतले. या साठी देखील त्यांना विरोध पत्करावा लागला. यांच्या पतींना लहानपणापासून आईचे प्रेम मिळाले नाही. त्यांचा सांभाळ त्यांच्या मावस आत्येने केला. त्यांच्या आत्येने त्यांना शिक्षणाची गोडी लावली. त्यामुळे जोतीरावांनी सावित्रीबाईंमध्ये देखील शिक्षणाची गोडी निर्माण केली आणि त्यांना शिकवले आणि समाजाचा विरोध पत्करला. त्यांनी आपल्या आत्या सगुणाऊंना देखील शिकवले आणि मागासांच्या वस्ती मध्ये एक शाळा उघडून दिली. सगुणाऊ यांनी त्या शाळेचा व्यवस्थितरीत्या सांभाळ केला आणि शिकवणी देऊ लागल्या पुढे ही शाळा बंद पडली. त्या नंतर जोतीरावांनी पुण्याच्या बुधवार पेठेत भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरू केली आणि शिक्षिका आणि प्राध्यापिका म्हणून तिथली जबाबदारी सावित्रीबाईंना दिली. ही शाळा मुलींसाठी पहिली शाळा ठरली. त्यांच्या शाळेत सुरुवातीला सहा मुली होत्या. हळू-हळू मुलींची संख्या वाढली. बऱ्याच सनातन्यानी याचा विरोध देखील केला पण त्या डगमगल्या नाही आणि त्यांनी हा उपक्रम सुरू ठेवला. त्यांनी अनेक सामाजिक कुप्रथा बंद केल्या. त्यांनी विधवा विवाह साठी एका केंद्राची स्थापना केली. त्यांना पुनर्विवाहासाठी प्रेरित केले. त्यांनी मागास वर्गीय लोकांसाठी देखील काम केले. अनाथासाठी देखील काम केले. 1897 मध्ये प्लेग साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव पसरला होता. त्यासाठी त्यांनी पुण्यात एक रुग्णालय सुरू केले आणि अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या रुग्णांची सेवा केली आणि त्या आजाराला बळी पडल्या आणि त्या साथीच्या रोगामुळे त्यांचे निधन झाले.त्यांनी कवियित्री म्हणून 2 पुस्तके लिहिली- काव्य फुले आणि बावनकशी सुबोध रत्नाकर. या दंपतीला महिलांच्या शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदानासाठी 1852 मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांना सन्मानित केले. केंद्र आणि महाराष्ट्र सरकार कडून सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अनेक पुरस्कार दिले जातात. या शिवाय यांच्या सन्मानासाठी टपाल तिकीट देखील काढण्यात आले आहे. 3 जानेवारी 1995 पासून सावित्रीबाईंचा जन्मदिन 'बालिका दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या या कारकिर्दीला मानाचा मुजरा.28 नोव्हेंबर 1890 रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या निधनानंतर देखील सावित्रीबाई फुले त्यांच्या अनुयायांसह सतत कार्यमग्न राहिल्या. ज्योतिबांच्या सामाजिक कार्याची अपूर्ण कामे हातात घेऊन सत्य शोधक समाज दूरदूरपर्यंत पसरविला.1897 मध्ये पुण्यात एक भयानक प्लेग ची साथ पसरली. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेऊ लागला. हा रोग संसर्गजन्य आहे हे कळल्यावर ब्रिटिश शासनाने जबरदस्तीने संभाव्य रुग्णांना वेगळे काढून स्थानांतरित करण्याचा उपाय योजला तेव्हा सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. अशा गंभीर परिस्थितीत त्या आजारी लोकांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देत होत्या. सावित्रीबाई स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता रूग्णांची सेवासुश्रृषा करीत राहिल्या. प्लेगच्या रूग्णांची सेवा करत असताना त्या स्वत: देखील प्लेगच्या बळी पडल्या आणि 10 मार्च 1897 रोजी त्यांचे निधन झाले.समाजात तीव्र विरोध असूनही महिलांचे जीवन आणि त्यांना शिक्षण देण्याची जिद तसेच रूढीवादी प्रथा सुधारण्याच्या महत्त्वपूर्ण योगदान कधीही विसरता येणार नाही. या बद्दल देश नेहमी सावित्रीबाई फुले यांचे ऋणी आहे.



# सुपे-सातकर वाडी येथे जागतिक महिला दिनानिमित्त योग-ध्यान सत्राचे अद्वितीय आयोजन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी I डॉ. देवेंद्र ओव्हाळ**

**खेड पुणे** : हार्टफुलनेस ध्यान संस्थेच्या पुणे –पाषाण वतीने 'एकात्म अभियान' अंतर्गत कार्यक्रम संपन्न सांस्कृतिक मंत्रालय , भारत सरकार यांच्या सहकार्याने सुरु असलेले एकात्म अभियान या उपक्रमाद्वारे आज दिनांक 8 मार्च 2025 ला माननीय सरपंच सौ सुमित्रा सचिन चांभारे ताईच्या मदतीने सुपे - सातकरवाडी येथे हार्टफुलनेस ध्यान संस्थेच्या पुणे –पाषाण वतीने जागतिक महिला दिनानिमित्त योग व ध्यान सत्र आयोजित करण्यात आले होते. या सत्रात सर्वांना योगाच्या विविध आसनाव्दारे आपल्या जीवनातल्या विविध आजारांवर भविष्यात कशी मात करता येईल व ते टाळता येतील याची माहिती व प्रात्यक्षिके देण्यात आली , त्याचबरोबर हृदयकेन्द्रित ध्यान हे प्राणाहुती च्या मदतीने केल्यावर कशी आपली आध्यात्मिक प्रगति होईल व त्याचबरोबर हार्टफुलनेस शिथिलीकरण करून आपल्या आपल्याच ताणाचे निराकरण करता येते ह्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले .या कार्यक्रमास हार्टफुलनेस संस्थेचे प्रतिनिधी श्री संदीप पाटील यांनी अगदी सोप्या शब्दात ग्रामस्थांना हार्टफुलनेस संस्थेची ध्यान पद्धती समजवली .सौ. नम्रता देशपांडे यांनी योग व शिथिलिकरणाचे प्रात्यक्षिक सर्व ग्रामस्थांकडून करवून घेतले . गुडघ्याचे आजार , पाठीचे आजार ,खांदे दुखी या आजारांवर कोणती आसने करावीत व किती वेळ करावीत हे समजावण्यात आले ,जेणेकरून सर्वजण कसे अधिक सक्षम व निरोगी राहतील त्यासाठी मार्गदर्शन केले.प्राणाहुतीच्या सहाय्याने हार्टफुलनेस ध्यान आपल्या रोजच्या जीवनात केल्याने येणाऱ्या मानसिक



ताण तणावाला दुर ठेऊ शकतो हयाचे प्रात्याक्षिक श्री सौरभ जैन ह्यांनी केले. सर्व ग्रामस्थ व स्वतः महीला सरपंच सौ सुमित्रा ताई व माननीय तुकाराम मोहन या क्रार्यक्रमाला नुसतेच उपस्थित न राहता पूर्ण सत्रात सहभागी होते.सर्वच ग्रामस्थ महिला व पुरुष अत्यंत उत्साहाने व खुल्या मनाने सर्व माहीती सकारत्मकता व जिज्ञासु भावनेने आत्मसात केल्याचा अनुभव सर्व हार्टफुलनेस प्रतींनिधींना आला.ग्रामस्थद्वारे हा कार्यक्रम अतिशय स्तुत्य असून खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांना देखील मार्गदर्शक स्वरूपाचा ठरणारा आहे. जर ध्यान धारणेची साथ ही आपल्या जीवनात स्वीकारल्यास जीवन अधिकाधिक सकारात्मक बनते. असे मत आढळून आले.हे एकात्म अभियान आपल्या जिल्ह्यातील सर्व खेड्यापाड्यापर्यंत पोहोचण्यासाठी आपण सर्वांनी हार्टफुलनेस संस्थेला सहकार्य करावे असे हार्टफुलनेस प्रतींनिधींनी सांगितले.

आज हार्टफुलनेस संस्थेकडून आपल्याला जी काही ध्यानाची अनुभूती देण्यात आली आणि अशा प्रकारचे ध्यान जर आपण नियमित केले तर आपण आपले कार्य अत्यंत आनंदाने पार पाडू शकू. तरी सर्वांनी आपल्या कार्याला मदत देऊन आपल्यावर शासनाने सोपवलेली जबाबदारी अगदी व्यवस्थितपणे व तणाव रहित होऊन पार पाडावी.असा विचार स्वतः सौ सुमित्रा ताईंनी व्यक्त केला .कार्यक्रमाच्या शेवटी श्री माननीय मोहन तुकाराम ह्यांनी सर्व हार्टफुलनेस प्रतींनिधी(पुणे –पाषाण) चे आभार मानले आणि भविष्यात परत आमच्या गावाला येऊन असेच मार्गदर्शन करावे अशी विनंती केली.हार्टफुलनेस संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृती मंत्रालयाच्या मार्गदर्शनानुसार या टप्प्यात भारतामधील आठ राज्यात ३० एप्रिल २०२५ पर्यंत एक लाख गावापर्यंत हार्टफुलनेस संस्थेमार्फत शारीरिक स्वास्थ्यासाठी योग, आधुनिक कृषी तंत्रज्ञान व ध्यानाचा अनुभव असा संयुक्त कार्यक्रम एकात्म अभियान या नावाने राबविण्याचे निर्देशित केलेले आहे. त्या अनुषंगाने हार्टफुलनेस प्रशिक्षक, स्वयंसेवक स्वयंस्फूर्तीने प्रत्येक खेड्यापाड्यात जाऊन हा कार्यक्रम सादर करत आहेत.

# मराठ मोळया लावणयचा शंभर नंबरी नजराणा



**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी** : दिव्या मुद्रा प्रोडक्शन, ट्विंस एस एल आर निर्मित आणि अर्चना थिएटर प्रस्तुत, मदमस्त अदाकारीने नटलेला मराठमोळ्या लावण्याचा शाभर नंबरी नजराणा "लावणी इशकाची" या कार्यक्रमाचा प्रयोग दि.२०/२/२०२५ रोजी दु.४ वां. शिवाजी मंदिर, दादर येथे मोठ्या थाटात पार पडला. या कार्यक्रमाचे संकल्पना, निर्माते श्री. राजेंद्र देशमुख विश्वासराव, सूत्रधार शेखर दाते, तसेच अकलूज लावणी महोत्सव २०२४ विजेत्या नृत्यांगना भैरवी मेस्त्री सह इतर नृत्यांगना नी यात सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे खास आकर्षण लावणी सम्राट श्री. आनंद साटम(खास घडा नृत्य फेमस) आणि अकलूज लावणी महोत्सव २०१२ विजेत्या नृत्य सम्राज्ञी,सिनेतारका विजया कदम याही होत्या.या प्रयोगासाठी खास सोलापूर हूने इव्हेंट मॅनेजमेंट श्री.सागर माने , मराठा व्यवसाय संघाचे सदस्य श्री.दीपक पोखरकर, उद्योजक श्री.किशोर माने, अहमदनगरचे उद्योजक श्री.धर्मानंद भोसले, तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्री. चित्रसेन गंडा कुश हे देखील उपस्थित होते. या सर्वांचे स्वागत व सत्कार अल्काज हेल्थ अँड ब्युटी पार्लर चा संचालिका सौ. अलका ताई अविनाश कोळी तोडणकर व सोहम मित्र मंडळाचे अध्यक्ष कु.सोहम कोळी तोडणकर, दिव्या मोरे यांनी पुष्प गुच्छ व श्रीफळ देऊन केले.

लावणी सम्राज्ञी पाहुणी कलाकार सिने तारका विजया कदम यांचा देखील शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला श्री.आल्हाद पाटील सर यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमा मागचे या संस्थेचे एकच उदिष्ट आहे की लावणी या कलेला लोकाश्रय मिळावा.तसेच या कलेकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन अजून चांगला व्हावा.या कलेला एक उच्च दर्जा प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.या कार्यक्रमाचे पडद्या मागचे कलाकार दिव्या दिव्या मुद्रा प्रोडक्शन व ट्वींस एस एल आर चे निर्मिती सहायक श्री. संतोष हंकारे, अलका ताई कोळी तोडणकर, राजश्री पाटील, प्रेम भाऊ बदाले,पुणे , निखिल मोरे, निकेत नाईक या सर्वांनी मोलाचे सहकार्य केले.लवकरच "लावणी इशकाची " या कार्यक्रमाचे प्रयोग पुणे, अहमदनगर, बीड, माजलगाव व सातारा या ठिकाणी सादर होणार आहेत.

# पेणच्या मूर्तीकारांनी घेतली आशिष शेलार यांची भेट !

**दैनिक युवक आधार**
**पेण वार्ताहर I किरण बांधणकर** : न्यायालयीन प्रक्रियेने गणपती मूर्तिकारांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न सरकार सकारात्मकतेने कायदेशीर योग्य भूमिका घेऊन सरकार गणेश मूर्तिकारांच्या पाठी आहे , माझी मुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री यांच्याजवळ याबाबत चर्चा झाली आहे, मूर्तिकारांना न्यायालयीन लढ्यात नक्कीच यश मिळेल असे आश्वासन यावेळी भाजप नेते तथा रायगड संपर्क मंत्री आशिष शेलार यांनी पेण येथे आमदार रवींद्र पाटील यांच्या व स्थानिक गणेश मूर्तिकारांच्या भेटी प्रसंग दिले.यावेळी त्यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी रायगडचा संपर्क मंत्री म्हणून जबाबदारी माझ्यावर दिली आहे रायगड मधील भारतीय जनता पार्टीचे दोन संघटनात्मक जिल्हे आमदार खासदार कार्यकर्ते पदाधिकारी यांची बैठक घेऊन रायगड मधील असली भाजपची शक्ती अधिक वृद्धीकत करण्यासाठी रायगड मध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते असेही त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी खासदार धैर्यशील पाटील, उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी



**पेण येथे भाजप नेते तथा रायगड संपर्क मंत्री आशिष शेलार त्यांचे गणेश मूर्ती देऊन स्वागत करताना भाजप उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील, तसेच गणेश मूर्तिकार.**

गणेश मूर्तिकार यांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.याप्रसंगी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, आमदार रवींद्र पाटील, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर,उरणचे आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा भाजप अध्यक्ष अविनाश कोळी, उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील, सरचिटणीस मिलिंद पाटील,युवा नेते अनिरुद्ध पाटील युवा नेते ललित पाटील, माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील तसेच महाराष्ट्र राज्य मूर्तिकार संघटनेचे अध्यक्ष अभय म्हात्रे, हमरापूर विभाग मूर्तिकार उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष जयेश पाटील, कुणाल पाटील,नितीन मोकल,दीपक,समीर सुयोग मोकल,मयुरेश चाचड आधी गणेश मूर्तिकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याण पूर्वेत दोन रेडी मिक्सर वाहनांच्या धडकेत नऊ वाहने चिरडली, सहा जखमी

**दैनिक युवक आधार**
**रशिद शेख(कल्याण)** : कल्याण पूर्वेतील पुणे लिंक रोड विजयनगर नाक्यावर शनिवारी सकाळी पावणे अकरा वाजण्याच्या दरम्यान तयार सिमेंटचा गिलावा वाहून दोन रेडी मिक्सर वाहनांनी नऊ वाहनांना धडक देऊन चिरडले. सुदैवाने या अपघातात जीवित हानी झाली नाही. या अपघातात १ डेम्पो चालक, ३ रिक्षा चालक २ नागरीक असे सहा जखमी झाले आहेत. एकाची प्रकृती गंभीर आहे.कल्याण पूर्वेतील विजयनगर हा वर्दळीचा भाग. अपघात होत असताना या रस्त्यावर गर्दी कमी होती. अन्यथा मोठी जीवित हानी झाली असती, असे या भागातील व्यापाऱ्यांनी आणि प्रत्यदर्शीनी सांगितले. प्रत्यक्षदर्शीनी या अपघाताबद्दल दिलेली माहिती अशी, की विजयनगरमधील पालिकेच्या ड प्रभाग कार्यालयासमोरून दोन रेडी मिक्सर वाहने पाठोपाठ उतारावरून चक्कीनाका भागात जात होती. उतारावर




असताना एक रेडी मिक्सर वाहनाचा ब्रेक निकामी झाला. मागील रेडी मिक्सर वाहन चालकाला समोरील रेडी मिक्सर वाहनाचा ब्रेक निकामी झाल्याचे समजताच, त्या वाहनाच्या चालकाने पुढील वाहनाला रोखण्यासाठी आपले वाहने पुढे नेण्याचा प्रयत्न केला. या गडबडीत ब्रेक निकामी झालेला रेडी मिक्सर समोरील टेम्पोला जोरदार धडकला. त्यामुळे टेम्पो बाजुच्या झाडाला आणि दुकानांच्या समोरील भागाला धडकला.टेम्पोला धडक बसल्याने टेम्पो चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि टेम्पोची धडक रस्त्याच्या कडेला उभ्या आहे

# ब्रह्मकुमारी राजयोग केंद्र कारंजा येथे जागतिक महिला दिवस उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या ब्रह्मकुमारी राजयोग केंद्र प्रभू मिलन भवन कारंजा येथे राज योगिनी ब्रह्मकुमारी मालती दीदी यांच्या अध्यक्षतेखाली दि. 8 मार्च 2025 शनिवार रोजी असंख्य ब्रम्हकुमारी महिला व ब्रम्हकुमार पुरुष परिवार यांच्या उपस्थितीत जागतिक महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला आहे. याप्रसंगी ब्रम्हकुमारी रिना बहन यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाची प्रस्तुती केली. ब्रम्हकुमार प्रविण भाई यांनी आपल्या सुमधूर स्वरात गीतगायन केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मध्ये असलेल्या चैतन्य मैत्र बहुउद्देशिय संस्थेच्या अध्यक्ष महाराष्ट्र भूषण पुरस्काराने विशेष सन्मानित ब्रम्हकुमारी सौ.भारती बहन भोरे तथा कारंजा शहरातील सुप्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ ब्रम्हकुमारी डॉ सोनाली बहन राऊत यांचा जागतिक महिला दिनानिमित्त ब्रम्हकुमारी मालतीदिदी यांचे मार्गदर्शनात त्यांचे व उपस्थित ब्रम्हकुमारी दिदींचे हस्ते सत्कार करण्यात आला. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी सर्व उपस्थित स्त्री शक्तीला जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला ब्रम्हकुमार प्रदिप भाई वानखडे यांचेसह ब्रम्हकुमारी परिवाराचे अनेक मंडळी उपस्थित होते . कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ब्रम्हकुमारी नयना दिदी यांनी तर आभार प्रदर्शन ब्रम्हकुमार डॉ. निखीलभाई कटारीया यांनी केले. असे वृत्त ब्रम्हकुमारी परिवाराचे ज्येष्ठ पत्रकार संजय कडोळे यांनी कळवीले .


# कवयित्री वसुंधरा निकम यांचे"अक्षरपुष्प"काव्यसंग्रहाचे दिमाखात प्रकाशन व ज्ञानमुद्रा साहित्य मंच आयोजित राजमाता जिजाऊ काव्य संमेलन उत्साहात संपन्न



**दैनिक युवक आधार**

**कवि सरकार इंगळी** : शनिवार दि.8 मार्च 2025 रोजी वसुंधरा निकम यांचे अक्षरपुष्प या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिका डॉ प्रा नलिनी महाडिक आणि यशवंतराव निकम माजी सहाय्यक आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या शुभहस्ते झाले प्रमुख उपस्थिती विश्वास नेरकर सचिव ग्रंथालय भारती महाराष्ट्र नंदकुमार सावंत अध्यक्ष शाहूपुरी सातारा डॉ माणिक जाधव संस्थापक जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन सातारा श्रीरामदास जाधव यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक भवन कोडोली येथे संपन्न झाला. डॉक्टर नलिनी महाडिक यांनी या कवयित्रेंकडून अजूनही सुंदर लेखन होईल त्यांनी लिहीत जावे साहित्य निर्मिती करावी अक्षर पुष्प या काव्यसंग्रहाचे थोडक्यात विवेचन केले. तसेच पहिल्या सत्रामध्ये दिग्विजय जाधव समृद्धी महाडिक यांनी अभिवाचन केले सौवसुंधरा निकम यांनी राजमाता जिजाऊ यांच्यावर व्याख्यान दिले दुपारच्या सत्रामध्ये राजमाता जिजाऊ काव्य संमेलनाचे प्रमुख पाहुणे प्रल्हाद पार्टी प्रदीप कांबळे, कवी सरकार इंगळी, हेमा जाधव, राजेंद्र पाटील होते 41 कवीकवयित्रींनी सहभाग घेतला महिला दिन निमित्त बहारदार कवितेचे सादरीकरण केले.चार उत्कृष्ट कवयित्रींना सन्मानचिन्ह प्रमाणपत्र गुलाब पुष्प देऊन गौरविले. इतर सर्व कवींना सन्मानपत्र गुलाब पुष्प देऊन गौरविले.या संमेलनासाठी कोल्हापूर , सांगली सातारा पाटण कराड लोणंद खंडाळा इ. ठिकाणाहून साहित्यिक आले होते. सूत्रसंचालन कवीआनंद भारमल व वैष्णवी महाडिक तर आभार छाया नाळे यांनी मानले प्रस्तावना सारीका यांनी केली. आयोजक प्रदीप निकम होते.

# विद्यार्थ्यांनी एआयसोबत लवकरच परिचित झाले पाहिजे - डॉ. भूषण केळकर




**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : सध्या जगात एआय तंत्रज्ञानावर आधारित सर्वाधिक संधी असल्यामुळे विद्यार्थ्यांनी एआयसोबत लवकरच परिचित होऊन स्वतः ते आत्मसात केले पाहिजे, असे मत चाणक्य मंडल परिवाराचे विश्वस्त आणि न्यूफ्लेक्स टॅलेंट सोल्युशन्सचे संचालक डॉ. भूषण केळकर यांनी सीकेटी महाविद्यालयात मार्गदर्शन शिबिरावेळी व्यक्त केले.जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी करिअरविषयक मार्गदर्शन सत्र रविवारी (दि. 9) खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयात प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करिअर आणि रोजगारविषयक वेगवेगळे उपक्रम राबवित असतात. त्याचाच एक भाग म्हणून या हे सत्र घेण्यात आले होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, ए.सी.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिरिंगचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार, सेंट. विल्फ्रेड कॉलेज ऑफ इंजिनिरिंगचे प्राचार्य डॉ. मनीष शर्मा, भागुबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजच्या प्राचार्य सानवी देशमुख, आरटीसीसीएस सिनिअर कॉलेजच्या प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य निशा नायर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, प्लेसमेंट सेलचे अध्यक्ष प्रा. एस.एस. कांबळे, भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, रोहित जगताप, देवांशु प्रभाळे, डॉ. आर.व्ही. येवले, ए.व्ही. पाटील, ट्रेनिंग अधिकारी आरती कागवडे यांच्यासह महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

द•ख•ल

## महाराष्ट्र पंचायत राज अध्यक्ष पदी संतोष पाटील दानवे साहेब यांची निवड



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुं निकाळजे**
**वरूड / जाफ्राबाद**

**जालना जिल्ह्यातील भोकरदन** - जाफ्राबाद विधानसभा मतदारसंघाचे लाडके , लोकप्रिय, तरुण - तडफदार आमदार श्रीमान संतोष रावसाहेब पाटील दानवे यांनी नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये हॅटट्रिक केली असून त्यांची महाराष्ट्र राज्याच्या पंचायत राज कमेटीच्या चेअरमन पदी नियुक्ती झाली आहे त्या अनुशंगाने जाफ्राबाद तालुका माहीती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने भाऊंना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आहे यावेळी माहीती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे जाफराबादचे तालूका अध्यक्ष श्री राजेश दौलतराव दामधर आणि तालूका सचिव श्री ज्ञानेश्वर निकाळजे तसेच तालुका सदस्य श्री विजय देशमुख, श्री सुरेश खंदाडे , श्री गजानन फलफले , श्री दिनकर जंजाळ , श्री गणेश जाधव आदी समितीचे सदस्य उपस्थित होते आदरणीय श्री संतोष भाऊ दानवे यांना राज्यमंत्री दर्जाचे पद मिळाल्यामुळे भारतीय जनता पक्षाचे सर्वच नेत्यांचे कार्यकर्त्यांनी आभार मानले आहेत .

## जाणीव सामाजिक सेवाभावी संस्थेतर्फे पी. एम. श्री. रा. जि. प. शाळा मुळेखंड येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दैनिक युवक आधार**

**रणिता ठाकूर उरण रायगड** : शनिवार दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत उलवे नोड येथील जाणीव सामाजिक सेवाभावी संस्थेतर्फे पी. एम. श्री. रा. जि. प. शाळा मुळेखंड येथील १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना पॅड आणि कंपास बॉक्सचं वाटप करण्यात आले.सुरूवातीला शाळेतील मुलींनी मंडळाच्या सदस्यांचे लेझीम नृत्याविष्कार व पुष्पवृष्टीने औक्षण करून स्वागत केले.तदनंतर छत्रपती शिवाजीमहाराज व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे पवित्र तुळसीचे रोप व शाल देऊन सन्मान करण्यात आला. तद्नंतर इयत्तानिहाय सर्व मुलांना शालेय पॅडचे वाटप करण्यात आले. मुळेखंड मराठी शाळेत सुरू असणारे विविध शैक्षणिक उपक्रम आम्ही सोशल मिडीयाच्या माध्यमातून पहात आहोत.या शाळेत शिक्षण प्रवाहात येणारी सर्व मुले ही आर्थिक दुर्बल घटक व सर्व सामान्य घरातील असतात त्यामुळेच आमच्या मंडळाकडून शिक्षण प्रवाहात मुलांनी टिकून रहाण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.त्यातीलच हा उपक्रम मुळेखंड शाळेत राबविण्याची संधी आदर्श शिक्षक संजय होळकर सर यांच्या माध्यमातून मिळाली.याचा आनंद वाटतो. शालेय परिसरात सुरू असणारे सुशोभीकरण, रंगरंगोटी ,दुरुस्ती पहाता एक सुंदर शाळा ही उरण तालुक्यातील मुळेखंड शाळा असेल असा आशावाद व्यक्त करण्यात आला.यावेळी आपल्या जाणीवचे सदस्य किरण मढवी , सुनिल ठाकूर, रितेश पाटील , सुधीर भोईर , चिंतामण पाटील , अंजू पाटील , विनया पाटील , जीवांश पाटील , रविंद्र भोईर , सचिन भगत , सपना भगत , सान्वी भगत , अनिष पाटील , नंदकुमार वाजेकर, ज्ञानेश्वर भोईर आणि भानुदास वास्कर,SMC अध्यक्षा मनिषा म्हात्रे,महेश म्हात्रे,जयवंती ठाकूर आई आदी उपस्थित होते.विशेष आजचा हा उपक्रम शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर सर व विद्या वाणी मॅडम प्रशिक्षणाला असून देखील एवढा भव्य कार्यक्रम शाळेतील दिशा तांडेल मॅडम व अर्चना पाटील मॅडम या दोन महिला शिक्षक भगिनींनी यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल शाळेच्या पालकाच्या वतीने विशेष कौतुक करण्यात येत आहे. शेवटी दिशा तांडेल मॅडम यांनी या संस्थेचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# जागतिक महिला दिनानिमित्त डिगोळ येथे महिलांचा सत्कार सोहळा...!



**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरूरआनंतपाळ** : जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा नेहरु युवा केंद्र स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य रामेश्वर धनराज चावरे डिगोळकर यांच्या तर्फे सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यांत सामाजिक राजकीय शैक्षणिक आरोग्य या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असणारा त्यांत शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत असलेल्या जिल्हा परिषद शाळेतील मनकर्णा हजारे, सीमा जाधव मॅडम, रेखा शिवपुजे मॅडम, अनुराधा वकील मॅडम, शृंगारे मॅडम, वाघमारे मॅडम होत्या.अंगणवाडी मधील सेविका त्यांत करुणा बिरादार, प्रवीण मुंजेवार, सरोजा वाडकर, अलीमुन मुंजेवार, विजश्री कांबळे, होत्या.राजकीय त्यांत ग्रामपंचायत मधील सरपंच कविता दासरे, सदस्या कलावती स्वामी, सुनिता बिरादार, वैशाली सुर्यवंशी होत्या.प्राथमिक आरोग्य केंद्रातील महिला निर्मलाताई सुरवसे , लक्ष्मी कांबळे, रेखा कांबळे यांचा समावेश होत.सामाजिक कार्य करणाऱ्या महिला त्यांत ज्योती वाडकर, धार्मिक शोभा बावगे इत्यादी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा शाल, पुष्पगुच्छ, पुस्तक, पेन देऊन सत्कार सोहळा मोठ्या थाटामाटात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले शिरुर अनंतपाळ तालुक्याचे पोलिस उपनिरीक्षक विठ्ठलराव दराडे साहेब होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अमोल निडवदे, नेहरु युवा केंद्र स्थानिक सल्लागार समिती सदस्य रामेश्वर चावरे, माजी विस्तार अधिकारी शिवशंकर पाटील, बीट जमादार बिराजदार, सरपंच कविता दासरे, महेश पाटील, धनराज चावरे, राम बिरादार, पत्रकार बाबुराव बोरोळे, युवा मोर्चाचे शरद पांचाळ, महेश भंडारकोटे, प्रसाद नाईकवाडे, नेहरु युवा केंद्राच्या युवा अधिकारी साक्षी समैया मॅडम, समन्वयक शुभम पाटील, तुळशीदास बिरादार, प्रल्हाद बिरादार, रमाकांत बिरादार, महादेव कोटे,एकनाथ ककुर्ले, प्रमोद पाटील,नागनाथ कोटे, जनक बिरादार,शैलेश बेवनाळे, अप्पासाहेब बिरादार, शिवहार कोटे, शुभम पाटील, खंडेराव बोयणे, राहुल कांबळे , सचिन वडजे, प्रताप बिरादार, संगम कोटे, उद्धव जाजुर्णे, व नागरिक उपस्थित होते.

## उरण पिरकोन येथे होणा-या रोजगार मेळाव्याचा प्रत्येक बेरोजगार तरुणांनी संधीचा लाभ घ्यावा



**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर** : लायन्स क्लब ऑफ पनवेल, द्रोणागिरी व उरण आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स, पनवेल व अविनाश म्हात्रे (पाले) व मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २३/३/२०२५ रोजी सकाळी १० ते ३.३० वा. या वेळेत रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन, ता. उरण. (कृ.द. जोशी सभागृह) येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. उमेदवारांनी आपली नावनोंदणी करण्यासाठी खाली दिलेल्या लिंकला क्लीक करून किंवा गूगलवर सर्च केल्यानंतर येणाऱ्या नावनोंदणी अर्जाला पूर्णपणे भरून स्वतःची नाव नोंदणी करावी.https://bit.ly/pirkonjobfair_registration या लिंक द्वारे नाव नोंदणी करावी. या मेळाव्यात विविध नामांकित कंपन्या व नियोक्त्यांकडून रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. या रिक्त पदांसाठी पात्रतेप्रमाणे उमेदवारांच्या नोंदणी व प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत.या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन, ता. उरण. (कृ.द. जोशी सभागृह) या पत्त्यावर उपस्थित रहावे असे आवाहन लायन्स क्लब ऑफ पनवेल, द्रोणागिरी व उरण आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स, पनवेल व अविनाश म्हात्रे व मित्र परिवार (पाले) यांच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा. लायन्स क्लब ऑफ पनवेल व यशस्वी ग्रुप ला. एस. जी चव्हाण अध्यक्ष 9372413342, ला. प्रमोद गजहंस - 9372603865, बाळकृष्ण म्हात्रे -9324725532, समाधान जावळे -9324725524,लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरीचे संदीप म्हात्रे -9821142202, अविनाश म्हात्रे (पाले) व मित्र परिवारचे प्रमुख - अविनाश म्हात्रे 9004709244 यांच्याशी संपर्क साधावा.

## भैय्याजी जोशींच्या वादग्रस्त विधानाचा शिवसेना उबाठा गटाच्या वतीने निफाडमध्ये तीव्र निषेध




**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**

**विनोद गायकवाड** : मुंबईत येणाऱ्या माणसाला मराठी शिकलं पाहिजे असं नाही मुंबईची एक भाषा नाही अनेक भाषा असे वादग्रस्त विधान करणाऱ्या भैयाजी जोशी यांनी केलेल्या या वक्तव्याचा निफाड येथे उबाठा गटाचे शिवसैनिकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाहीर निषेध केला आहे ,भैय्याजी जोशींनी मराठी भाषेचा अपमान केला असून, ..त्यांचेवर गुन्हा दाखल झाला पाहिजे,त्यांचेवर गुन्हा दाखल न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा कडक इशारा निवेदनाद्वारे या वेळी शिवसैनिकांनी दिला आहे,या वेळी निफाड पोलीस ठाण्याचे पी एस आय विश्वनाथ निकम,पो.हवा.नितिन सांगळे, ढेकळे, सानप, तसेच शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा युवा सेना जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे, निफाड शहर अध्यक्ष संजय धार राव, मुकूंद होळकर, गोपाळ कापसे,रतन गाजरे, संजय शिरसाट, आयुष निकम,प्रमोद गाजरे, बापूसाहेब कुंदे, रमेश जेऊघाले,बाळु डोंगरे, नाना सानप, जावेद शेख,निरज चोरडिया, आदी शिवसैनिक उपस्थित होते,

## जनरल एज्युकेशन वायु विद्युत बोकरविडा शाळेने साजरा केला आगळावेगळा महिला दिन

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर । उरण प्रतिनिधी** : स्त्री म्हणजे प्रेम, कणखरपण,प्रेरणा जीआई आहे संपूर्ण आयुष्यभर आपल्या मुलांसाठी झटते, एक बहीण आहे जी कायम आपल्या भावाच्या पाठीशी उभी असते, ती एक पत्नी आहे जिला आपल्या जोडीदाराच्या सुखदुःखाची चिंता असते .आणि ती एक मुलगी आहे जिला कुटुंबासाठी काहीही करण्याची जिद्द असते म्हणून जागतिक महिला दिन हा दिवस महिलांसाठी खास आहे. आई म्हणून ,बहीण म्हणून ,मैत्रीण म्हणून तर कधी जीवनसाथी म्हणून त्यामुळे तिच्या प्रत्येक भूमिकेचा आदर करायला हवा असा हा ८ मार्च महिला दिन म्हणून महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी तिचा कर्तृत्वाचा, गौरव करण्यासाठी जगभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी ठीक ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.अशा या महिला दिनानिमित्त जनरल एज्युकेशन वायु विद्युत बोकरविडा शाळेत हा दिवस माता पालकांसाठी वेगवेगळ्या स्पर्धा घेऊन मोठ्या जल्लोषात साजरा झाला.पालकांसाठी बादलीत बॉल टाकणे, बटाटा शर्यत, सुई धागा ओवणे, दोरी उड्या,संगीत खुर्ची ,चमचा गोटी असे मजेशीर आणि शक्ती युक्ती वापरून खेळले जाणारे खेळ घेण्यात आले. या खेळात प्रत्येक माता पालकांनी सहभागी होऊन मनसोक्त आनंद घेतला. यावेळी शाळेतील वातावरण खेळातील आनंद घेताना देहभान हरपून सर्व विद्यार्थी आणि माता पालक हे रममाण झाले होते.महिला दिनानिमित्त शाळेतील खेळल्या गेलेल्या स्पर्धां मधून अव्वल ठरलेल्या स्पर्धकांना



बक्षीस देण्यासाठी जय मल्हार व चेतन हॉटेल च्या मालकीण युगंधरा पाटील,वुई क्लब द्रोणागिरी संस्थेच्या अध्यक्ष सुरेखा भोईर, सचिव भावना भोईर, सदस्य रंजना म्हात्रे, तृप्ती भोईर, प्रीती पाटील,पुष्पा म्हात्रे, यांच्या शुभहस्ते शाळेकडून बक्षीस देऊन गौरविण्यात आले. प्रतीक पाटील माजी विद्यार्थी ही या कार्यक्रमासाठी उपस्थित होता. तसेच वुई क्लब द्रोणागिरी संस्थेकडून शाळेतील शिक्षिकांना महिला दिनानिमित्त एक भेटवस्तू ही देण्यात आली.आजचा महिलादिन विशेष साजरा होण्यासाठी आलेल्या मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करुन ,ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. शाळेतील विद्यार्थ्यांचे मनोगत एक सुरेल गीत व पाहुण्यांनाचे मनोगत झाले. यावेळी फक्त शाळेतील विद्यार्थीच नाही तर शाळेतील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व मातापालक यांनी या कार्यक्रमातून आनंद घेतला. याकरिता शाळेच्या मुख्याध्यापिका सौ हेमा कवळसे मॅडम यांनी व त्यांच्या शिक्षक वृदांनी विशेष मेहनत घेतली.

# कळंबोली वसाहती मधील बैठ्या चाळी पावसाळ्यात होणार जलमय

### होल्डिंग पॉन्ड लगतच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण न करण्याची विजय खानावकर यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल महापालिकेमार्फत सिडको वसाहती मधून नवीन रस्ते बांधणी सुरू आहे. त्या अनुषंगाने कळंबोली येथील केएलई कॉलेज ते विसर्जन तलाव रोडपाली, मार्गावर कॉंक्रिटीकरण न करता डांबरीकरण करण्याची मागणी मा. नगरसेवक खानावकर यांनी पालिकेकडे केली आहे.अदर्श शहराचे स्वप्न साकारणाऱ्या पनवेल महापालिकेने विविध विकास कामामध्ये प्रामुख्याने पनवेल महापालिका क्षेत्रातील सिडको नोडमधील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याचे काम गेल्या वर्षभरापासून पालिकेने हाती घेतली आहे. त्यामुळे कॉलनीतील मुख्य रस्ते खड्डेमुक्त होणार आहेत. त्याच बरोबर 'कळंबोली नोड मधील विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण व पुनर्पृष्ठीकरण', करण्याचे काम कासव गतीने सुरू आहे. याच कामाचा भाग असलेल्या केएलई कॉलेज ते विसर्जन तलाव रोडपाली, मार्गावर कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. परंतु आधीच समुद्र सपाटीपासून खोल असलेली वसाहत या उंच कॉंक्रिटीकरणामुळे पुन्हा जलमय होणार आहे. त्यामुळे या बैठ्याचाळीलगत असलेल्या रस्त्यावरचे कॉंक्रिटीकरण कॉंक्रिटीकरणामुळे उंची वाढणार आहे. त्यामुळे ठिकाणाहून पाण्याचा



विजय खानावकर संजय कटेकर यांच्याशी चर्चा करताना

निचरा होण्यासाठी जागा उरणार नाही. परिणामी नेहमीच पावसाळ्यात जलमय होणाऱ्या या बैठक चाळीतील घरांना आणखी पावसाळ्यात घरात पाणी शिरण्याचा त्रास होणार आहे. ही बाब नगरसेवक विजय खानावकर यांच्यासह बैठ्या चाळीतील नागरिकांनी पनवेल पालिकेच्या लक्षात आणून दिली असून या ठिकाणी सिमेंटचा रस्ता न बांधता पूर्वीच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी माजी नगरसेवक विजय खानावकर व नागरिकांनी पनवेल पालिकेचे मुख्य अभियंता संजय कटेकर यांच्याकडे केली आहे. यावेळी प्रभाग क्रमांक दहा मधील बैठ्या चाळीतील महिला व नागरिक उपस्थित होते.

**कळंबोली वसाहत ही समुद्रसपाटीपासून खोल असून दरवर्षी पावसाळ्यामध्ये वसाहतीमध्ये पाणी भरते. मागील वर्षापासून पालिकेने वसाहतीमधील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण सुरू केले आहे त्यामुळे रस्त्यांची उंची वाढली असून वसाहती खोल झाले आहेत त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात वसाहतींची आणखी दैना होणार आहे त्यामुळे होल्डिंग पॉन्ड लगतच्या रस्त्याचे सिमेंटकरण न करता आहे तोच रस्ता डांबरीकरण करावा अशी मागणी पालिके कडे केली आहे.**

**विजय खानावकर**
**माजी नगरसेवक कळंबोली प्रभाग.10**

# डॉ. किरण राम गावंड (कंपनी कमांडर) यांना 'डॉक्टरेट ऑफ फिलोसोफी' पदवी प्रदान

**दैनिक युवक आधार**

**ठाणे (पंकजकुमार पाटील)** : ठाणे येथे राहणाऱ्या डॉ. किरण राम गावंड (कंपनी कमांडर) यांना नुकतच अमेरिकेतील प्रोवेस विद्यापीठातर्फे "डॉक्टरेट ऑफ फिलोसोफी" ही पदवी देऊन सन्मानित करण्यात आले आहे.गेली ३५ वर्ष पगार न घेता केलेली देशाची सेवा, भारतीय संस्कृती व इतिहासाचे जतन आणि संवर्धन तसेच १५० वर्षापासूनच्या पौराणिक वस्तु, नाणी व शस्त्रे याचे एका ठिकाणी प्रदर्शनीस तथा सुरक्षीत ठेवण्यासाठी "काशीबाई माधवराव गावंड" संग्रहालयाची स्व-कतृत्वावर स्थापना, देशाच्या ठेवा आम जनतेला प्रदर्शनास खुला करून त्यांनी देशाची शान वाढवली आहे . डॉ . गावंड यांच्या जीवनाचे तत्वज्ञान येणा-या पुढील पिढयांना आदर्श मार्ग दाखविण्यास मार्गदर्शन ठरेल यात शंका नाही. या कार्याला सलाम करण्यासाठी त्यांना प्रोवेस विद्यापीठातर्फे ही पदवी एका शानदार कार्यक्रमात सन्मानपूर्वक बहाल करण्यात आली. हि पदवी प्राप्त केल्याबद्दल समाजातील सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# क.ग.दा. मोरे महाविद्यालय महिला सन्मान एक दिवसापुरता मर्यादित नको :- डॉ. माधव खालकर

**दैनिक युवक आधार**

**निफाड प्रतिनिधी । राहुल कुलकर्णी** : महिला दिन फक्त एकच दिवस साजरा न करता महिलांप्रती सर्वांनी आदर आणि सन्मान ठेऊन रोजच तो साजरा करावा. महिला दिन हा एक दिवसाचा सोहळा होऊ नये. आपल्या आयुष्यातील महिलांचे स्थान पाहता, आईमुळेच आपण जग पाहतो, त्यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात आईचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. स्त्री अबला मुळीच नाही तर अंगणातून आकाशाला गवसणी घालणाऱ्या महान शास्त्रज्ञ कल्पना चावला आणि सुनीता विल्यम्स ही स्त्रिरुपे आहेत. भारतीय संस्कृती स्त्रीत्वाला देवत्वाचे रूप देते परंतु वेळप्रसंगी स्त्री रणचंडिका झालेली बघायला मिळते, कारण समाज तिच्या सहनशीलतेचा अंत पाहतो, एक स्त्री घराचा स्वर्ग बनवू शकते आणि नरकही बनवू शकते. तिच्या अंतर्मनात नेहमीच सृजनाचे स्फुलिंग पेटलेले असते. त्यातून तिच्या मनाच्या गाभाऱ्यातून अनेक नवकल्पना जन्म घेतात आणि म्हणूनच स्त्री आज प्रत्येक क्षेत्रात अलौकिक कर्तृत्व गाजवत आहे, तोच वारसा आजच्या मुलींनी जोपासत आपल्या स्वप्नांना पूर्णत्वास न्यावे असे प्रतिपादन डॉ. माधव खालकर यांनी केले मविप्र समाजाचे क.ग.दा. मोरे महाविद्यालय निफाड येथे "आंतरराष्ट्रीय महिला दिन" कार्यक्रम प्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते, पुढे त्यांनी इतिहासातील सीतामाता,अहिल्या,ताराराणी,जिजाऊ माँसाहेब,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अशा अनेक महान स्त्रियांच्या कर्तृत्वाला



उजाळा देत, अनेक श्लोक,अभंग आणि कवितांच्या माध्यमातून त्यांनी स्त्री शक्तीचा जागर केला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सुरेश जाधव यांनी अध्यक्षीय मनोगतात महिलांच्या सद्यःस्थितीवर लक्षवेधी विवेचन करत, स्त्री सन्मान आणि आदर हा संस्कार जर प्रत्येकावर झाला तर अन्याय अत्याचाराच्या घटना घडणार नाहीत, यासाठी इतिहासाचे आणि संविधानाचे अनेक दाखले देत त्यांनी महिला दिनाचे महत्त्व उद्धृत केले. स्त्रियांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत असलेल्या संघर्षाला त्यांनी उजाळा दिला आणि सद्यःस्थितीविषयी खंत व्यक्त केली. समाजाचा कठोर विरोध पत्करून आपल्या समाजकल्याणाच्या कार्यापासून परावृत्त न होता महान इतिहास घडविणाऱ्या महिला शक्तीला त्यांनी सलाम केला.कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी सर्व महिला प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर सेविकांचा आणि विद्यार्थिनीचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ.सुरेखा जाधव यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.पी.पी. शार्दूल तर आभार डॉ. एल.जे. सुसान यांनी मानले. कार्यक्रम यशस्विततेसाठी डॉ. पी. डी. ढेपले, प्रा. वाय.डी. कडलग तसेच वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर सेवकांनी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## नांदेड रेल्वे स्थानकावरून भारत गौरव पर्यटक ट्रेनद्वारे अयोध्या तीर्थयात्रेस शुभेच्छा




**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी। चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -:** जिल्हा येथील रेल्वे स्थानकावर आज महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना अंतर्गत भारत गौरव पर्यटक ट्रेन द्वारा अयोध्येला जाणाऱ्या भाविकांना शुभेच्छा देण्यात आल्या. डॉ खा. अजितजी गोपछडे माझ्या हस्ते यात्रेकरूंच्या सुखमय प्रवासासाठी रेल्वेला हिरवी झेंडी दाखवून यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी आमदार हेमंतभाऊ पाटील, संघटन मंत्री संजयभाऊ कौडगे, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार डॉ तुषार राठोड, भाजप जिल्हाध्यक्ष संतुकाराव हंबर्डे, तसेच लक्ष्मणराव ठक्करवाड, मिलिंद देशमुख, दत्ता पाटील कोकाटे, माणिक लोहगावे, शिवाजीराव पाटील, रुपेश पाटील भोकसखेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.सर्व उपस्थित मान्यवरांनी भाविकांना अयोध्या यात्रेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या व या धार्मिक यात्रेद्वारे भक्तांना आध्यात्मिक लाभ मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली

## रायगड जिल्ह्यात २० हजार ४८९ घरकुलांचे महिलांच्या हस्ते भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : महिला दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजनेंतर्गत २० हजार ४८९ घरकुलांचे भूमिपूजन ठिक ठिकाणी महिलांच्या हस्ते करण्यात आले. या अनुषंगाने अलिबाग पंचायत समितीमार्फत वाडगांव आदिवासी वाडी येथे पंतप्रधान जनजाती आदिवासी न्यास अभियान मार्फत पी.एम. जन मन योजने अंतर्गत १९ घरकुलांचे भूमिपूजन कार्यक्रम जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत पार पडला. घरकुलांची कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना किशन जावळे व डॉ. भरत बास्टेवाड यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपवनसंरक्षक राहूल पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, पंचायत समिती गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे, वाडगांव ग्रामपंचायत सरपंच सारिका पवार, उपसरपंच



जयेंद्र भगत उपस्थित होते.रायगड जिल्ह्यात केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनेंतर्गत घरकुलांची कामे हाती घेण्यात आली आहेत. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात २० हजार ४८९ घरकुलांचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. शनिवारी महिला दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी या घरकुलांचे भूमिपूजन महिलांच्या हस्ते करण्यात आले. या अनुषंगाने अलिबाग पंचायत समितीच्या माध्यमातून वाडगांव आदिवासी वाडी येथे १९ घरकुलांच्या भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**वाडगांव हे स्वच्छ व सुंदर गाव आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला १०० टक्के कर वसुली करणारी वाडगांव ग्रामपंचायत आहे. गावातील उर्वरित घरकुलांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. गावात कुणी निरक्षर लोक असतील तर त्यांच्यासाठी वर्ग सुरू करून वाडगांव १०० टक्के साक्षर करू या. तसेच गावातील लोकांना सर्व योजनांचा लाभ मिळेल या दृष्टीने काम करुन, येथील आदिवासी वाडीचा सर्वांगीण विकास करण्यात येईल.**

**किशन जावळे**
**जिल्हाधिकारी, रायगड**

---

**केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनेंतर्गत जिल्ह्यात २० हजार ४८९ घरकुलांचे महिलांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात येत आहे. महिलांच्या हस्ते एवढ्या मोठ्या प्रमाणात घरकुलांचे भूमिपूजन करण्याचा हा राज्यातील पहिलाच कार्यक्रम ठरेल. सर्व घरकुलांचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात येणार आहेत. तसेच वाडगांव आदिवासी वाडीवरील १९ घरकुलांची कामे ३१ मार्चपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा.**

**डॉ. भरत बास्टेवाड**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड.**

## जागतिक महिला दिनानिमित्त भारज बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात कचरा कुंड्या वाटप



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : ज्ञानेश्वर कुं निकाळजे**

**वरूड / जाफ्राबाद :** जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील भारज बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने दिनांक ८ मार्च रोजी शनिवार जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात भारज बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात साजरी करण्यात आला.यावेळी महिलांना सन्मान देऊन कचरा कुंड्या वाटप करण्यात आल्या आणि स्वच्छ भारत मिशन टप्पा क्रमांक 02 अंतर्गत ग्रामपंचायत कर्मचारी यांनी घरोघरी प्रत्यक्ष जाऊन महिलांना कचराकुंड्या वाटप करण्यात आल्या आहेत स्वच्छ गाव सुंदर परिसर आपले गाव निरोगी राहावे,गावात कुठल्याच प्रकारचा कचरा बाहेर न टाकता कचरा कुंड्यात टाकावे.यावेळी उपस्थित सौ शकुंतलाबाई रामचंद्र तेलंग्रे यांचे सुपुत्र शरद तेलंग्रे , ग्रामसेवक सीआय पठाण , घरकुल विभाग जाफ्राबाद कर्मचारी , योगेश्वर देवडे,रोजगार सेवक एम डी गायकवाड , मधुकर बेराड , आणि उपसरपंच सर्वच ग्रामपंचायत सदस्य व गांवकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मकरंद अनासपुरे यांना स्वर्गीय बाबासाहेब (भाऊ)आकात स्मृती पुरस्काराने केले सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**परतूर- जालना(अशोक ठोके) :** स्वर्गीय बाबासाहेब (भाऊ) आकात यांनी शैक्षणिक,सहकार व सामाजिक क्षेत्रात केलेले काम मला भावले,त्यामुळे हा पुरस्कार मिळाल्याचा मनस्वी आनंद वाटतो असे प्रतिपादन प्रसिद्ध चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी केले. परतूर येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या प्रांगणात रविवारी दिनांक 9 मार्च रोजी अभिनेते मकरंद अनासपुरे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते स्व. बाबासाहेब भाऊ आकात स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव कपील आकात हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक प्रा.डॉ. रणजितसिंह निंबाळकर,विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. दासू वैद्य, विद्यापीठ व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रा. डॉ. भागवत कटारे, प्रा. डॉ. शिवाजी मदन,संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई आकात,विलासराव आकात,प्रा.डॉ.भास्कर साठे,प्रा. डॉ. मुंजा धोंगडे,प्राचार्य डॉ. भारत खंदारे,डॉ. कुणाल आकात, वर्षाताई आकात, भक्तीताई आकात यांची उपस्थिती होती.अभिनेते मकरंद अनासपुरे पुढे म्हणाले की,बाबासाहेब भाऊंनी शैक्षणिक, सहकार व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याने मी प्रभावीत झालो आहे. भाऊंचे कार्य माझ्या मनाला भावलेआणि मी हा पुरस्कार स्वीकारण्यास थेट परतूरला आलो. परंतु हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नाही तर त्यात अनेकांचा सहभाग आहे.जीवनात माणुसकी महत्वाची आहे.मराठी भाषा समृद्ध आहे. मराठीचे श्रेष्ठत्व आपण सर्वांनी जपले पाहिजे.भाषेमुळे माणूस मोठा होतो माणसामुळे भाषा नव्हे असेही अनासपुरे म्हणाले. मराठवाड्याच्या मातीतून आणखी चांगले कलावंत घडावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आपल मनोगत व्यक्त करताना कुलगुरू




प्रा. डॉ. विजय फुलारी म्हणाले की, बाबासाहेब भाऊंचे कार्य उल्लेखनीय असेच आहे. अभिनेते मकरंद अनासपुरे यांचे कार्यही मोठे आहे. सिनेक्षेत्रासह नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या कामामुळे महाराष्ट्राची मान निश्चितच उंचावली आहे. अनासपुरे यांनी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागास भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे तसेच कपील भैया आकात यांनी विविध शाळांच्या विद्यार्थ्यांना एकत्रित करून सांस्कृतिक कार्यक्रम घ्यावा.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव द्यावा.त्यातून कलावंत घडण्यास मोठी मदत होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.याप्रसंगी कवी दासू वैद्य यांनी अभिनेते अनासपुरे यांच्या जडणघडणीबद्दल सांगताना त्यांच्या बालपणीच्या अनेक आठवणींना उजाळा दिला.तसेच अनासपुरे यांनी प्रतिकूल परिस्थितीशी झगडत मिळविलेल्या यशाचे कौतुक केले. प्रास्ताविक करताना कपील आकात म्हणाले की, भाऊंच्या निधनानंतर आमच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. परंतु आमच्या कुटुंबावार प्रेम करणाऱ्या अनेकांनी आम्हाला दिलासा दिला. शिक्षण संस्था आमचे कुटुंब आहे. भाऊंचे सहकारी, मित्रपरिवार, नातेवाईक यांनी प्रेम दिले. त्यामुळे आम्हाला काम करण्याची ऊर्जा मिळाली.यावेळी सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, मानपत्र, स्मृतीचिन्ह देऊन कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी अशोक गारकर व प्रा. डॉ. शरद बोराडे यांनी संपादित केलेल्या व भाऊंच्या जीवनकार्याला उजाळा देणाऱ्या ' आठवणीतले भाऊ ' या स्व. बाबासाहेब भाऊ आकात स्मृती विशेषकांचे विमोचन अभिनेते मकरंद अनासपुरे, कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी, कपिल भैया आकात व मंचावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला परतूर-मंठा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला दिनाचे औचित्य साधत ग्रुप ग्रामपंचायत दूंदरेच्या वतीने भैरवदेव विद्यालयात केले विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : स्त्री म्हणजे प्रेरणा तिच्या कष्टांनी घर उजळते तिच्या स्वप्नांनी जग बदलले तिच्या हसऱ्या चेहऱ्याने सुख मिळते तिच्या अस्तित्वाने सृष्टी सजते दर वर्षी 8 मार्च हा दिवस जगभरात " जागतिक महिला दिन म्हणून उत्साहात साजरा केला जातो स्त्री सक्षमीकरण आणि महिलां भगिनींच्या सर्वांगीण विकासा करिता अनेक योजनांच्या माध्यमातून आपलं दायित्व जपणारी आणि विकास कामांचा माध्यामातून अल्पावधीतच आदर्श ग्रामपंचायत म्हणून नावारूपाला आलेली पनवेल तालुक्यातील दूंदरे ग्रुप ग्रामपंचायत यांच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधत श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात भैरवदेव विद्यालयातील विद्यार्थ्यांनी ग्रुप ग्रामपंचायत दूंदरेचे कार्यक्षम सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य सोबतच सर्व महिलां भगिनीं व रॉबिनहुड आर्मी आणि नमस्ते योगा क्लासेस या सर्व मान्यवर मंडळींचे लेझीम पथकाच्या गजरात भव्य असं



स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवातीला दूंदरे ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाषशेठ भोपी रॉबिनहुड आर्मी नमस्ते योगा क्लासेसचे सर्व सदस्य व विद्यालयाचे मुख्याध्यापक साळुंखे सर्व शिक्षकवृंद यांनी राजमाता जिजाऊ सावित्रीबाई फुले लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.त्यानंतर रॉबिन हुड सेवाभावी संस्थे मार्फत नमस्ते योगा क्लासेसच्या वतीने मुलींकरता जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत योगा प्राणायाम योगिकनृत्य सादर करून घेतले तर ग्रुप ग्रामपंचायत दूंदरे आणि रॉबिन हूड सेवा भावी संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले तर ग्रुप ग्रामपंचायत दूंदरेचे कार्यक्षम सरपंच सुभाष भोपी यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमा दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमा अंतर्गत दूंदरे ग्रामपंचायत हद्दीतील पी.एम. जनमन व पंतप्रधान आवास योजनेतील घरकुलांचे भूमिपूजन व बांधकाम सुरू असलेल्या घरांची पाहणी देखील करण्यात आली. जागतिक महिला दिनाचं औचित्य साधत भैरवदेव विद्यालयात आयोजित कार्यक्रमा करिता प्रमुख उपस्थितीत लाभली होती ती दूंदरे ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोपी जिल्हा कृषी अधिकारी खेडेकर पवनकुमार नजन अंगणवाडी पर्यवेक्षीका ज्योती गांधी नमस्ते योगा संस्थेच्या संस्थापक आमिषाजी शहा सोबत दूंदरे ग्रामपंचायतीचे सदस्य शांताराम चौधरी विश्वास पाटील सुप्रिया करमेलकर ग्रामविकास अधिकारी खेडकर भैरवदेव विद्यालयाचे मुख्याध्यापक साळुंखे व सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी अंगणवाडी सेविका या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माळी मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन अमितजी पाटील यांनी आपल्या ओघवत्या भाषा शैलीत करत हा अनोखा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

## तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या माध्यमातून महिला दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कासारभट, तालुका - पनवेल या ठिकाणी तालुका विधी सेवा समिती पनवेल यांच्या माध्यमातून ८ मार्च रोजी महिला दिन आदिवासी महिला भगिनी आणि बचत गटाच्या महिला यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जयराज वडणे, जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांनी भूषविले. समवेत सह दिवाणी न्यायाधीश एस. आर.पाटील, सह न्यायाधीश एम.डी. सैंदाणे, सह दिवाणी न्यायाधीश पी.एस. बिडकर आणि सह दिवाणी न्यायाधीश डी. एस.वाघमारे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते.या कार्यक्रमास संबोधित करताना सह दिवाणी न्यायाधीश पी.एस. बिडकर यांनी राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, माता रमाई, यासारख्या असंख्य कर्तृत्ववान महिलांचे वैचारिक वारसदार आपण आहोत. आणि



तोच वारसा आपण तितक्याच सक्षमतेने पुढे नेण्याची धमक आज सुद्धा आपल्यात आहे. एक स्त्री म्हणून आपण इतके प्रतिभावानं आहोत अशा आशयाचं मनोगत व्यक्त केले. सोबत सह दिवाणी न्यायाधीश सुशीला पाटील यांनी समाजव्यवस्थेतली स्त्रियांबद्दलची वास्तविकता दाखवून देऊन स्त्रियांना दैनंदिन कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते, कोणकोणते बदल सर्वांना त्यांच्या जगण्यात करून आणावे लागतील, आणि कायद्याच्या अनुषंगाने महिलांचे असलेले स्थान कसे अबाधित राखता येईल अशा इतर अनेक बाबींना स्पर्श करत वास्तविकता मांडण्याचे काम आपल्या मनोगतातून व्यक्त केले. जिल्हा न्यायाधीश वडणे यांनी कायद्याच्या बाबतीत आपण सजग असायला हव, जेणेकरून आपण कोणत्याही अन्यायाला बळी पडणार नाही. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा एक माणूस म्हणून सर्वोत्तम विकास करण्यासाठी समाज घडवण्यासाठी महिलांचे अनन्य साधारण उपकार या व्यवस्थेवर आहेत. त्याबद्दल या संपूर्ण स्त्री वर्गाचे त्यांनी आभार मानले. या महिला दिनाच्या कार्यक्रमाचे प्रसंगी अड. ज्योती उरणकर, अड. प्रज्ञा भगत यांनी देखील आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविका विधी स्वयंसेवक शैलेश कोंडसकर यांनी केले.